# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## सुधारित परिपत्रक

तात्काळ-अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून स्वीकारण्यात आलेल्या विविध शुल्कांसंदर्भात माहिती ऑनलाईन स्वरूपात तात्काळ सादर करणेबाबत...

**संदर्भ:-** १) शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांचेकडील जा.क्र. उशिसं/मवि-१/वि.प.अता.प्र.८६१९/२०२१/११०३० दि. १२/१०/२०२१ रोजीचे पत्र

**महोदय/महोदया,**

उपरोक्त नमूद विषय व संदर्भ अवलोकनी घेता सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी **अतारांकित प्रश्न क्र. ८६१९ मधील प्रश्नाचे अनुषंगाने लायब्ररी शुल्क, मेंटेनन्स शुल्क, गणवेश शुल्क, प्रॅक्टिकल शुल्क** चे संदर्भाने केलेली कार्यवाही **तात्काळ/विनाविलंब इमेलद्वारा (affiliation.t२@unishivaji.ac.in)** या कार्यालयास **दि. १६/११/२०२१ पर्यंत** सादर करावी.

सदरील माहिती शासकीय कामी आवश्यक आहे. त्यामुळे ज्या महाविद्यालयांकडून माहिती प्राप्त होणार नाही तसेच उक्तनमूद बाबत भविष्यात काही प्रश्न उद्‌भवल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. सबब, सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी याची गांभीर्याने नोंद घेवून **तात्काळ/विनाविलंब** सदर माहिती पाठवावी.

आदेशान्वये

(श्री. व्हि.एस.सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत-वरीलप्रमाणे
संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 705
दिनांक- 15 NOV 2021

C:\Users\admin\Downloads\Circular 2019 (5).docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
दुं ध्वनी.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.:उशिसं/मवि-१/वि.प.अता.प्र. ८६१९/२०२१ /११०३० दिनांक- /२०२१

12 OCT 2021

विधान मंडळ कामकाज
अतितात्काळ/कालमर्यादीत

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय: विधान परिषद अतारांकित प्रश्न क्र. ८६१९**
**राज्यात शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत..**

संदर्भ: शासनपत्र क्र.: विसता-२०२१/प्र.क्र.२०४/विशि-३ दि. ७.१०.२०२१

संदर्भांकित पत्राच्या विषयानुषंगाने कळविण्यात येते की, विधान परिषद अतारांकित प्रश्न क्र. ८६१९ मधील प्रश्न भाग-३ पुढीलप्रमाणे आहे - विद्यापीठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षणासाठी जात नसतानाही लायब्ररी शुल्क, मेंटेनन्स शुल्क, गणवेश शुल्क, प्रॅक्टिकल शुल्क जूनच्या आत भरण्याबाबत सक्ती केल्याचे माहे मार्च २०२१ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले असून डिस्टन्स एज्युकेशनप्रमाणे कॉम्प्युटर तथा ऑनलाईन टयुशन विद्यार्थ्यांना दिले जात असताना अनावश्यक आगाऊ शुल्क घेतल्याची लेखी तक्रार लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे विद्यापीठास केली आहे, हे खरे आहे काय?

उपरोक्त प्रश्नांबाबत आपल्या विद्यापीठातील तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधील वस्तुस्थितीदर्शक अहवाल तात्काळ या संचालनालयास सादर करावा.

विधान मंडळ कामकाजाचे महत्व व गांभिर्य विचारात घेऊन कृपया प्रथम प्राधान्याने कार्यवाही करावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.